॥ अंतरी पेटवू ज्ञानज्योत ॥

# कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव

# Kavayitri Bahinabai Chaudhari North Maharashtra University, Jalgaon

## जनसंपर्क विभाग

जळगाव दि.२६ (               )  कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठात सोमवार, दि.२६ नोव्हेंबर रोजी भारतीय संविधानाच्या उद्देशिकेचे वाचन करण्यात आले.

विद्यापीठाच्या अधिसभागृहात झालेल्या या कार्यक्रमप्रसंगी कुलगुरु प्रा.पी.पी.पाटील, व्यवस्थापन परिषद सदस्य दिलीप पाटील, कुलसचिव भ.भा.पाटील, परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक बी.पी.पाटील, वित्त व लेखाधिकारी डॉ.बी.डी.कऱ्हाड हे मंचावर उपस्थित होते. यावेळी बोलताना कुलगुरु प्रा. पाटील म्हणाले की, भारतीय संविधानाचे स्मरण करीत असताना प्रत्येक नागरिकाने आपल्या मुलभूत हक्कासोबतच जबाबदारी आणि कर्तव्याची देखील जाणीव ठेवायला हवी.

डॉ.आंबेडकर विचारधारा विभागाचे भारत कडबे यांनी संविधानाच्या उद्देशिकेचे सामुहिक वाचन केले.कार्यक्रमाचे सुत्रसंचालन जनसंपर्क अधिकारी डॉ.सुनील पाटील यांनी केले व शेवटी आभार मानले. विद्यापीठातील अधिकारी व कर्मचारी मोठया संख्येने उपस्थित होते.

---

जा.क्र : कबचौ उमवि/१६/हस्तदेय/२०१८ दिनांक : २६ नोव्हेंबर, २०१८

प्रति,
मा. संपादक / प्रतिनिधी,

कृपया, उपरोक्त बातमी आपल्या दैनिकातून प्रसिध्द करावी, ही विनंती.

आपला विश्वासू,
स्वाक्षरीत प्रत/-
( सुनील पाटील )
जनसंपर्क अधिकारी